# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१९ फेब्रुवारी, २०२०

☎ : 07172-264300
📠: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

## पत्नीस जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीस आजन्म कारसावाची शिक्षा

पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत घरगुती वादावरून पत्नीला जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपींना १८/०२/२०२० रोजी **मा. श्री. वि.द.केदार, जिल्हा सत्र न्यायाधीश, चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत यातील आरोपी नामे शंकर जयराम दोडके वय ५० रा. दुर्गा चौक दुर्गापुर, चंद्रपुर हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर वांरवार संशय घेत होता. दिंनाक २७/११/२०१७ रोजी आरोपीने संशयावरून वाद घालुन तिला मारहाण केली. आणि लोखंडी रॉडने तिच्या डोक्यावर मारून जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे अप.क्र. ४६४/२०१७ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तपासी अधिकारी पोलिस निरिक्षक एच. एस.यादव पोलीस स्टेशन दुर्गापुर यांनी **आरोपी नामे शंकर जयराम दोडके वय ५० रा. दुर्गा चौक दुर्गापुर, चंद्रपुर** यास अटक करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १७/०२/२०२० रोजी **आरोपीस कलम ३०२ भादंवि मध्ये आज्नम कारावासाची शिक्षा व १०,०००/—रू दंड न भरल्यास २ वर्ष कारावायाची शिक्षा मा. श्री. वि.द.केदार, जिल्हा सत्र न्यायाधीश, चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **श्री. संदीप नागपुरे, सरकारी अभियोक्ता** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. करतारसिंग मडावी, पोलीस स्टेशन दुर्गापुर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————